आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 16/07/2026 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 157 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# मोशी दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबीयांना भक्कम आधार

## दोषींवर कठोर कारवाईसह महापालिकेचे ठोस निर्णय..

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी :- मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आज झालेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सभेत दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासह दुर्घटनेची सखोल चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**




दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेमार्फत रुपये 10 लाखांची आर्थिक मदत, तर जखमींना प्रत्येकी रुपये 1 लाखांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. ठेकेदार मे. अँटोनी लारा यांच्यामार्फत मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसाना 50 लाख मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार. तसेच मृतांच्या मुलांच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च करण्यात येणार असून, मृत व्यक्तींच्या कुटुंबातील पात्र वारसांना महानगरपालिका सेवेत नोकरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

दुर्घटनेच्या अनुषंगाने मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना सेवेतून निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. दुर्घटनेची कारणे, तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी आणि संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात येणार आहे. तसेच अँटोनी लारा कंपनीचे प्रकल्प प्रमुख व सुरक्षा निरीक्षक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासोबतच, शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम व विकेंद्रीकृत करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका सभेत यापूर्वी झालेल्या निर्णयानुसार शहरातील सर्व प्रभागांमध्ये कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

"दुर्घटनेत जीव गमावलेल्या सहकाऱ्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत देऊन आमची जबाबदारी संपणार नाही. त्यांच्या मुलांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारत, पात्र वारसांना रोजगाराची संधी मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल. त्याचवेळी या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. निष्पक्ष चौकशीतून जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल," अशी भूमिका महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.

# कर्जत, खालापूर तालुक्यातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**रायगड - मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जत, खालापूर तालुक्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन, भाताची रोपे वाहून गेली आहेत. फळ बागांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत. त्याबाबतचा अहवाल तत्काळ शासनाला पाठविण्याचे आदेश मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.**



खासदार श्रीरंग बारणे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा प्रशासकीय इमारत खालापूर येथे बुधवारी आढावा घेतला. कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय, आरोग्य, महावितरण सर्व विभागांची बैठक घेतली. आमदार महेंद्रशेठ थोरवे, उपविभागीय अधिकारी कर्जत खालापूर प्रकाश सकपाळ, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, कर्जत तहसीलदार धनंजय जाधव, कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, खोपोली नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज पाटील, खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय बांगर, गट विकास अधिकारी खालापूर संदिप कराळ, सार्वजनिक बांधकाम विभागगाचे उपविभागीय उप अभियंता संदेश पाटील, मोरबे नवी मुंबईचे

कार्यकारी अभियंता संतोष उनवणे, तालुका आरोग्य अधिकारी कल्याणी इंगोले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता काळेल, एमआयडीसी पातळगंगा अग्निशमन दलाचे स्टेशन अधिकारी आशिष मोरे, खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रोशमताई मोडवे, शिवसेना खालापूर तालुका संपर्क प्रमुख विजाभाऊ पाटील, शिवसेना खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, शिवसेना महिला आघाडी खालापूर तालुका प्रमुख रेश्माताई आंग्रे, मोतीरा ठोंबरे, उमेश गायकवाड,रोहित विचारे व सबंधित अधिकारी उपस्थित होते.खासदार बारणे म्हणाले, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये 3, 4, 5, 6 जुलै रोजी अतिवृष्टी झाली. यामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन वाहून गेली, बंधारा फुटाला, भाताचे रोपे वाहून गेली. फळ बागांचे नुकसान झाले.

या तालुक्यांमधील रस्ते, साकव, छोट्या पुलावांरुन पाणी गेले. पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणचे लोखंडी कठडे वाकले आहेत नदीलगत्याच्या स्मशानभूमीकडे जाणारे रस्ते वाहून गेले. खोपोली शहरातील अनेक भागात पाणी शिरले होते. पाणीपुरवठा योजना बंद पडली. त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. रस्ते दुरुस्त करावेत. दोन दिवस वीजपुरवठा खंडित झाला होता. त्याची तत्काळ दुरुस्ती करावी. पुन्हा वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. अतिवृष्टीत दोन्ही ताुलक्यात चार जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांना शासनाच्या वतीने तत्काळ मदत केली आहे. नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचा अहवाल शासनाला सादर केल्यानंतर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळवून दिली जाईल.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 16/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षात मोफत बसपास योजना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील इयत्ता 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांना, तसेच महानगरपालिका हद्दीतील शासनमान्य खासगी शाळा व महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना घर ते शाळा व शाळा ते घर अशा स्वरूपाचा बसचा मोफत पास देण्यास मान्यता देण्यात आली आहे.**

**तसेच शासनमान्य खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी बसपासच्या एकूण रकमेपैकी 25 टक्के रक्कम चलनाद्वारे महानगरपालिका कोषागारात भरून ते चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर केल्यानंतर बसपास देण्यात येणार आहे,यास महापालिका सभेने मान्यता दिली आहे.**



या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात किमान 75 टक्के उपस्थिती पूर्ण केलेली असावी. विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळेचे अंतर किमान 2 कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. ही योजना महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका व शासनमान्य खासगी शाळांमधील इयत्ता 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे. विद्यार्थ्यांनी निर्धारित नमुन्यातील अर्ज भरून रहिवासी पुरावा, आधार कार्ड अथवा इतर पत्ता असलेले ओळखपत्र, शाळेचे प्रमाणपत्र तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून संबंधित शाळेत जमा करावेत. खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी निर्धारित रक्कम पीएमपीएमएलच्या अधिकृत डेपोमध्ये भरून अर्ज सादर करावेत, तर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना बसपास पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत अर्ज वाटप व स्वीकार प्रक्रिया 15 जुलै ते 31 जुलै 2026 या कालावधीत होणार असून, बसपास तयार करणे व वितरण 15 जुलै ते 31 ऑगस्ट 2026 दरम्यान करण्यात येईल. या बसपासचा लाभ 30 जून 2027 पर्यंत उपलब्ध राहणार आहे.

महानगरपालिकेने सर्व मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी वेळेत सादर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, पालकांनीही निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून आपल्या पाल्यांसाठी मोफत बसपास योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

# स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा शासकीय जयंती कार्यक्रमांच्या यादीत समावेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्य शासनाने स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीचा समावेश शासकीय जयंती कार्यक्रमांच्या यादीत केला आहे. यासंदर्भातील परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने आज जारी केले आहे.**



परिपत्रकानुसार, स्व. अजित अनंतराव पवार यांची जयंती दरवर्षी 22 जुलै रोजी राज्यभर शासकीय स्तरावर साजरी करण्यात येणार आहे. त्यानुसार मंत्रालय तसेच राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येईल.

हा कार्यक्रम राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांबरोबरच शाळा आणि महाविद्यालयांमध्येही आयोजित करण्यात येणार आहे. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभाग प्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालये व संस्थांमध्ये कार्यक्रमाचे नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

स्व. अजित अनंतराव पवार यांनी सार्वजनिक जीवनात केलेल्या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने त्यांच्या जयंतीचा शासकीय कार्यक्रमांच्या यादीत समावेश करण्यात आल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 16/07/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# उसने पैशांच्या वादातून भावाचा चाकूने खून; देहूगाव हादरले

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब**

देहूगाव परिसरात उसने घेतलेल्या पैशांच्या वादातून सख्ख्या भावाने भावाचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी देहूरोड पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माळीनगर, देहूगाव येथील संभाजी टिळेकर यांच्या खोलीत मंगळवारी (दि. 14 जुलै) पहाटे 5 ते 5.30 वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी प्रश्नशाय राजेंद्र कुदळे (वय 20) याचा मोठा भाऊ विनायक राजेंद्र कुदळे याच्याकडे लोक उसने दिलेले पैसे मागण्यासाठी वारंवार येत असल्याने दोघांमध्ये वाद झाला.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर संतापलेल्या आरोपीने कांदा कापण्याच्या चाकूने विनायकच्या छातीच्या डाव्या बाजूस वार केला. गंभीर जखमी झालेल्या विनायकचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

या प्रकरणी कुंदन हिरालाल भगत (वय 23) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम 103(1) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास देहूरोड पोलीस करीत आहेत.

# बँकेच्या ताब्यातील फ्लॅटचे सील तोडून बेकायदेशीर प्रवेश; दाम्पत्यावर गुन्हा

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब**

मोशी येथील एका गृहनिर्माण सोसायटीमधील बँकेच्या ताब्यात असलेल्या फ्लॅटचे सील व कुलूप तोडून बेकायदेशीररित्या प्रवेश केल्याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पाईन रोडवरील सेक्टर क्रमांक 6 मधील कल्पतरू क्रेस्ट सोसायटी येथे ही घटना 3 ते 6 जुलै दरम्यान घडली. बँकेने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मालमत्ता ताब्यात घेतल्यानंतर ती सील करण्यात आली होती.

मात्र आरोपी हरी दत्तात्रय शिंदे (वय अंदाजे 46) व त्यांच्या पत्नीने फ्लॅटचे सील व दरवाज्याचे कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचा आरोप आहे. यावेळी बँकेने लावलेला अधिकृत बॅनरही फाडून नुकसान करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी विजय हरिभाऊ शिंदे (वय 38) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 329(4), 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.




# भाजीच्या चवीवरून वाद; कामगाराला बेदम मारहाण

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब**

चाकण परिसरात बटाट्याच्या भाजीच्या चवीवरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. या घटनेत एका कामगाराला गंभीर दुखापत झाली असून त्याच्या ओठांना टाके पडल्याची माहिती पोलिसांनी दिली.

उत्तर चाकण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राक्षेवाडी (ता. खेड) येथे 13 जुलै रोजी रात्री 8 वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी रामनिवास बिलाश बरई (वय 45) यांनी जेवणासाठी बनवलेल्या बटाट्याच्या भाजीची चव चांगली नसल्याने दुसरी भाजी देण्याची मागणी केली होती.

यावरून आरोपी शैलेश यादव याच्याशी वाद झाला. त्याने आपल्या भावाला धर्मेंद्र यादव याला फोन करून घटनेची माहिती दिली. भावाने चिथावणी दिल्यानंतर संतापलेल्या आरोपीने फिर्यादीला लाकडी दांडक्याने तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या मारहाणीत फिर्यादीच्या तोंडाला व हाताला गंभीर दुखापत झाली. ओठांना टाके पडले असून उजव्या हाताच्या तीन बोटांनाही दुखापत झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी उत्तर चाकण पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शहरातील कचरा समस्या सोडवण्यासाठी प्रभागनिहाय जबाबदारी निश्चित व्हावी - अभिषेक बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड: शहरातील कचरा व्यवस्थापन ही एक गंभीर समस्या बनली असून, ती कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आता प्रत्येक प्रभागात कचरा वर्गीकरण केंद्र उभारून प्रभागनिहाय जबाबदारी निश्चित करावी, अशी भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी महापालिकेच्या सभागृहात मांडली. या संदर्भात कुठलेही राजकारण न होता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्रित येवून पुढाकार घेत कचऱ्याची समस्या मार्गी लावावी, असेही त्यांनी नमूद केले.**



शहरातील कचरा समस्या मुळापासून संपवण्यासाठी महापालिकेने आता विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारले पाहिजे. याबद्दल अधिक माहिती देताना अभिषेक बारणे यांनी सांगितले की, शहराचा कचरा प्रश्न सुटण्यासाठी प्रत्येक प्रभागाची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. या नव्या नियोजनानुसार, प्रत्येक प्रभागामध्ये कचरा विलगीकरण आणि वर्गीकरणाचे स्वतंत्र केंद्र कार्यान्वित केले जावे. यामुळे ओल्या आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खतनिर्मिती किंवा पुनर्वापर करणे सोपे होईल. हे काम प्रत्यक्ष जमिनीवर अंमलात यावे, यासाठी संबंधित एजन्सी आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.कचरा व्यवस्थापनासोबतच, मोशी येथील कचरा डेपो येथे नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याचा निर्णयही सभापती बारणे यांनी जाहीर केला. यात मृत व्यक्तींच्या प्रत्येक वारसाला महापालिकेच्या वतीने 10 लाख रुपये, तर संबंधित संस्थांकडून 25 लाख रुपयांची आणि शासनाकडून 5 लाखाची आर्थिक मदत दिली जाणार आहे. याव्यतिरिक्त, जखमींच्या उपचारासाठी आणि त्यांच्या वैद्यकीय गरजांसाठी महापालिका सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट करून ही प्रक्रिया त्वरित राबवावी, असे त्यांनी सांगितले.

या संकटकाळात महापालिका आयुक्त, एनडीआरएफ (NDRF), लष्करी जवान (मिलिटरी) आणि मनपा अग्निशामक दलाने दाखवलेल्या तत्परतेचे सभापती अभिषेक बारणे यांनी विशेष कौतुक केले. या बचाव पथकांनी जीवाची बाजी लावून केलेल्या कामगिरीमुळेच अनेकांचे प्राण वाचले, असे सांगत त्यांनी या सर्व जवानांच्या धैर्याला सलाम केला.

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील 32 प्रभागांमध्ये महापालिकेच्या 8 ते 9 हजार कर्मचाऱ्यांची विभागणी करून त्यांना आपत्कालीन कामासाठी प्रशिक्षित केले जावे. तसेच, नदीपात्र आणि नाले लगतच्या धोकादायक ठिकाणांची पाहणी करून तिथे सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. पावसाळ्यापूर्वी ड्रेनेज लाईनची साफसफाई आणि वृक्षछाटणी पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

मदत वाटपाच्या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. हे सर्व ठराव तातडीने मंजूर करून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनावर सोपवण्यात आली आहे. मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासह शहराच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले आहे.

# चलत्या रेल्वेतून पडलेल्या वारकऱ्याला जीवनदान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे – पुणे रेल्वे स्थानकावर घडलेल्या एका थरारक घटनेत रेल्वे कर्मचाऱ्याच्या प्रसंगावधानामुळे एका वारकऱ्याचा जीव वाचला असून मोठा अपघात टळला आहे. पंढरपूर वारीनिमित्त पालखी दर्शनासाठी पुण्यात आलेले एक वृद्ध वारकरी चालत्या रेल्वेतून अचानक खाली पडल्याने काही क्षणांसाठी परिसरात एकच खळबळ उडाली.**




प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वे सुरू असतानाच वारकरी तोल जाऊन प्लॅटफॉर्म आणि रेल्वे रुळांच्या मधोमध पडले. काही सेकंदांत गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र त्याचवेळी ड्युटीवर असलेल्या मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील सिग्नल अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे कर्मचारी आशीष वाघचौरे यांनी विलक्षण धाडस आणि प्रसंगावधान दाखवत तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी रुळांजवळ पडलेल्या वृद्ध वारकऱ्याला सुरक्षितपणे बाहेर ओढून घेतले. त्यांच्या या तत्परतेमुळे संभाव्य जीवघेणा अपघात टळला आणि एका वारकऱ्याचे प्राण वाचले.या घटनेनंतर रेल्वे प्रशासन, सहकारी कर्मचारी आणि प्रवाशांकडून आशीष वाघचौरे यांच्या धाडसाचे आणि मानवतावादी भूमिकेचे कौतुक होत आहे. कर्तव्याच्या पलीकडे जाऊन दाखवलेल्या या साहसामुळे ते अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.

पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी रेल्वेने प्रवास करत असताना ही घटना घडली. त्यामुळे प्रवाशांनी रेल्वे प्रवासादरम्यान अधिक सावधगिरी बाळगावी, असे आवाहनही रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968